अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# मराठी उद्योगभवन आणि तटकरेंचे आश्वासन

मुंबई ही देशाची औद्योगिक राजधानी मानली जाते. याच मुंबईतल्या मराठी माणसाला आपला उद्योग टिकवून ठेवण्यासाठी सरकारी प्रोत्साहनाची नितांत गरज आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असूनही इथल्या मराठी माणसालाच आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागतो, हे निश्चितच दुर्दैवी म्हणावे लागेल. शेजारच्या गुजरात विकासाच्या अनेक कथा, कहाण्या प्रसार माध्यमांमधून ऐकायला मिळत असतात. परंतु तिथले सरकार हे स्थानिक गुजराती माणसाला उद्योगाकरिता सर्वप्रकारचे सहकार्य उपलब्ध करून देते. तेच धोरण महाराष्ट्रही राबवू शकतो. यासाठीच स्वतंत्रपणे मराठी माणसाचा उद्योग आणि व्यवसायातील सहभाग वाढवणारे विशेष धोरण सरकारने आखले पाहिजे. गेल्याच महिन्यात मराठी उद्योजक, व्यावसायिक आणि व्यापारी मित्र मंडळाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात राज्याचे जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांनी एक महत्त्वाचे आश्वासन दिले होते. या मंडळाचे कार्याध्यक्ष अनंत भालेकर यांनी मराठी माणसाच्या उद्योग विकासासाठी मुंबईत मराठी उद्योग भवन असले पाहिजे, अशी महत्त्वपूर्ण मागणी त्या कार्यक्रमात केली होती. सुनिल तटकरे यांना या मागणीचे महत्त्व लक्षात आले आणि त्यांनी त्याच कार्यक्रमात असे मराठी उद्योगभवन उभारले जाईल आणि त्यासाठी यावेळच्या राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूदही केली जाईल, अशी ग्वाही दिली गेली होती. राज्याचा अर्थसंकल्प सादर व्हायला आता एक आठवडा शिल्लक राहिला आहे आणि म्हणून या आश्वासनाचे स्मरण तटकरेंनी ठेवावे आणि मराठी माणसाला उद्योगप्रवण करण्यासाठी शासकीय पातळीवर प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आम्ही करत आहोत. महाराष्ट्रातल्या आर्थिक विकासामध्ये किंवा उद्योग व्यापार क्षेत्रामध्ये मराठी माणसाचे प्रमाण अत्यल्प आहे. अन्य भाषिकांची संख्या जवळपास सत्तर ते ऐंशी टक्के आहे. राज्याच्या अनेक योजनांचे फायदे ही मंडळी घेत असतात. सरकारही त्यांच्यासाठी अनेक सवलती देत असते. मराठी माणसामध्ये व्यवसाय करण्याची वृत्ती नाही. अशी अनेकदा टीका केली जाते. त्यात थोडेफार तथ्य असले तरी त्यामागची कारणे कोणी लक्षात घेत नाही. गुजराती, मारवाडी, जैन हा ठराविक वर्ग पिढ्यान्‌पिढ्या व्यावसायिक म्हणूनच ओळखला जातो. मराठी माणसाचे तसे नाही.पण आता बदलत्या काळानुसार मोठ्या प्रमाणावर मराठी तरुण उद्योग व्यवसायामध्ये येतात. त्याचवेळी त्यांना सरकारी पातळीवर जर योग्य संधी मिळाली तर त्याचे त्याला सोने करता येऊ शकेल.

### मराठी तरुणाच्या उद्योगशीलतेसाठी

गेल्या तीस वर्षांपासून मुंबईतला मराठी उद्योजक-व्यावसायिक एकत्र यावा, यासाठी प्रयत्न होत आहे. या सगळ्या कालावधीमध्ये त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. इतर भाषिक व्यापाऱ्यांप्रमाणे त्याच्याकडे पैसा खुळखुळत नसतो किंवा सरकारी यंत्रणांकडूनही आपली कामे करून घेणे त्याला अनेक वेळेला जमत नाही. अशा परिस्थितीत मुंबईतली आपली उद्योग-व्यवसायाची जागा कशी टिकवायची, इथपासून ते आपण करीत असलेला व्यवसाय बंद पडणार नाही यासाठी त्याला प्रचंड परिश्रम करावे लागत आहेत. कारण एकूणच मुंबईतल्या व्यापार-उद्योगामध्ये अन्य भाषिक व्यापारी अधिक संख्येने आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते संघटित आहेत. आपल्या भाषा बांधवांना ते बरोबर मदत करीत असतात. सरकार दरबारीसुध्दा त्यांची कामे मराठी माणसापेक्षा अधिक लवकर होतात. ही आज वस्तुस्थिती असल्यामुळे मराठी माणूस उद्योगात येण्याचा धोका पत्करत नव्हता. मराठी माणसाच्या मनातून हा न्यूनगंड आणि भयगंड दूर करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. महाराष्ट्र आज एवढा भौगोलिकदृष्ट्या संपन्न आहे की, अगदी नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आधारावर इथे अनेक प्रकारचे उद्योग उभे राहू शकतात. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून हाच मराठी तरुण कारखानदारीच्या क्षेत्रातही अग्रेसर होऊ शकतो. त्याला कोणकोणत्या संधी मिळू शकतात. त्याच्या मराठीपणासाठी सरकारला त्याला काय काय सवलती देऊ शकते, याचे मार्गदर्शन करणारे हक्काचे मार्गदर्शन केंद्र मुंबईत आवश्यक आहे. त्याला प्रशिक्षण देण्यापासून ते उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या सर्वप्रकारचे सहाय्य या उद्योगभवनामधून मिळवता येऊ शकेल, अशी व्यवस्था झाली पाहिजे. यासाठीच मराठी उद्योग-व्यावसायिक आणि व्यापारी मित्र मंडळाने गेल्या तीस वर्षांपासून मराठी उद्योगभवनाचा आग्रह धरलेला आहे. गेल्याच वर्षी मंडळातर्फे राज्य पातळीवरील लक्ष २०२० या नावाची व्यावसायिकांची मोठी परिषद मुंबईत पार पडली. मुख्यमंत्र्यांनी त्याचे उद्घाटन केले होते. त्यावेळेलासुध्दा कार्याध्यक्ष अनंत भालेकर यांनी या मराठी उद्योगभवनाचे महत्त्व विशद केले होते. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीदेखील मराठी माणसाने सेवा उद्योगात मोठ्या प्रमाणावर कार्यरत व्हावे, असे आवाहन केले होते. परंतु या सगळ्याकरिता मराठीपणाचा वसा टिकवणारे आणि उद्योग-व्यापारामध्ये मराठी माणसाला अग्रेसर करणारे तितकेच भक्कम असे व्यासपीठ हवे आहे. ती काळाची गरज आहे.

### सगळ्या राज्यांची मुंबईत भवने

मुंबई इतक्या वेगाने बदलते आहे की, पुढच्या पंचवीस वर्षांमध्ये तिच्या एकूणच रंगरुपामध्ये आमूलाग्र बदल होईल. आंतरराष्ट्रीय दर्जाचे महानगर म्हणून इथे अनेक सोयी-सुविधा निर्माण केल्या जात आहेत. जगातले सर्वात मोठे आणि देशातले सर्वात आकर्षक विमानतळाचे नुकतेच उद्घाटन झाले. देशभरातून आणि जगभरातून येणाऱ्या उद्योजकांसाठी पायघड्या अंथरल्या जातात. या ठिकाणी जवळपास प्रत्येक राज्याच्या मालकीचे स्वतंत्र भवन आहे. एवढेच नव्हे तर, षण्मुखानंद हॉल, मेवाड भवन, कर्नाटक संघ हॉल, गुजरात भवन अशा अनेक मोठमोठ्या इमारती सरकारने दिलेल्या स्वस्तातल्या भूखंडांवर उभ्या आहेत. परंतु मराठी माणसासाठी एकही हक्काचे उद्योगभवन नाही ही तितकीच मोठी शोकांतिका आहे. अनंत भालेकर यांनी तर सरकारकडे बाजारभावाने भूखंड मिळावा अशी मागणी केली. मराठी उद्योजक आणि व्यावसायिक मित्र मंडळ त्या भूखंडावर मराठी माणसाच्या उद्योगविषयक प्रयत्नांना चालना देण्याचे अत्याधुनिक केंद्र सुरू करू इच्छिते. सरकारने त्यांची जरी मागणी मान्य केली तरी महाराष्ट्राच्या मराठी माणसाच्या उद्योगशीलतेला पाठिंबा दिल्यासारखे होईल. निदान त्याची दखल सुनील तटकरे यांनी घेतली, त्याचे महत्त्व ओळखले आणि म्हणून त्यांनी यावर्षीच्या अंदाजपत्रकात त्याची तरतूद करण्याचे आश्वासन दिले आहे, ते त्यांनी कसोशीने पाळावे.